# अध्याय ६९ वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः । श्रीसद्गुरवे नमः॥

चोळाप्पा श्रीगुरु भक्त। घरच्या वस्तूही विकीत ॥
परंतु सेवा न सोडीत। गुरु रहाती त्याचे घरीं ॥१॥

एकदां श्रीगुरु सांगती। करा रांधप शीघ्रगती ॥
सासू बायको खिन्न होती। घरांत कांहीं नसल्यानें ॥२॥

मग यतिवर सांगती। कशास उदासीन चित्तीं ॥
घरांत जाऊन पहाती। तर अन्न तयार असे ॥३॥

आनंदानें पात्रें मांडिलीं। सकळ पोटभर जेविलीं ॥
अन्नपूर्णा श्रीगुरु जवळी। तेथें उणें कांहीं नसे ॥४॥

भाविक मालोजी नृपति। श्रीगुरूच्या भोजना प्रती ॥
नेमणूक करून देती। चोळाप्पाला चिंता नुरे ॥५॥

गुरुनाथ होते संन्यासी। परी लौकिक आजारासी ॥
करतांना ते कवणासी। कधीं दिसले नाहींत ॥६॥

मात्र करिती आचमन। आणि करिती खूप स्नान ॥
आठ आठ दिन ही स्नान। कधीं कधीं ते न करिती ॥७॥

सुरेखसें गंधलेपन। तसें स्नान पान भोजन ॥
त्यांना करविती भक्त जन। गुरु स्वतः न करिती ॥८॥

गुरु बहुत रूपें धरिती। नाना स्थानीं सदा फिरती ॥
कोठें केव्हां काय करिती। लोकांस कसें कळणार ॥९॥

नाना स्थानीं श्रीगुरु गेले। लोक सन्मार्गास लाविले ॥
पादुका स्थापिती वेळो वेळे। केले अन्यही प्रकार ॥१०॥

दाजी भोंसले मुंबईस। राहती अगत्य कामास ॥
परंतु चित्त गुरु चरणांस। श्रीगुरु मूर्ति द्रवतसे ॥११॥

मुंबईस गुरु माउली। दाजीबाच्या घरीं पातली ॥
त्यांची चित्त वृत्ति खुलली। होते प्रज्ञापुरासही ॥१२॥



माघाची कृष्ण प्रतिपदा। गाणगापुरीं उत्सव सदा ॥
तेथें जाऊन गुरुपदा। सेविती नृपति मालोजी ॥१३॥

श्रीनरसिंह सरस्वती। तेथें त्यांना दृष्टांत देती ॥
आम्ही प्रत्यक्ष नृसिंहयती। तुमच्या गांवीं वसतसे ॥१४॥

येथें येण्याचें नसे कारण। संतोषलें नृपतिमन ॥
सर्वांस दृष्टांत सांगून। लोकसंशय घालविला ॥१५॥

मग राजे मालोजी भक्त। अक्कलकोटी उत्सव करीत ॥
दत्तजयंती उत्सव होत। दाजी पुढाकारानें ॥१६॥

प्रज्ञापुराच्या आसपास। गुरु फिरती बहुवस ॥
भक्त चोळाप्पा गुरुदास। जवळ नेहमीं रहातसे ॥१७॥

एकदां एका जागेवर। निवडुंग कांटे अपार ॥
वरून चालती गुरुवर। लोकां सांगती या तुम्ही ॥१८॥

जरी तेथें लोक पुष्कळ। कोणी नसे गुरु जवळ ॥
भक्त चोळाप्पाची चाल। श्रीगुरुसम होतसे ॥१९॥

यतिवरा व चोळाप्पाला। मुळींच कांटा न लागला ॥
गुरुपदीं जो विश्वासला। संकटें त्याला न बाधती ॥२०॥

चोळाप्पा यजुर्वेदी विप्र। कृष्णाप्पा, अण्णाप्पा त्याचे पुत्र ॥
जांवई ही श्रीपाद तत्र। गुरुसेवा भावें करी ॥२१॥

गुरुपदीं नित्य पूजन। भजन पुराण कीर्तन ॥
समाराधना अन्नदान। होई मंगल आरती ॥२२॥

शेवटीं भक्त भावें गर्जती। जयजयकार घोष घुमती ॥
श्रीगुरुदेव दत्त मूर्ती। संतुष्ट प्रसन्न होतसे ॥२३॥

जय जय श्रीगुरुदेवदत्त। म्हणतां फटकळ बोलत ॥
त्याचा भाव स्पष्ट असत। दत्त अवतार घे सदा ॥२४॥

मूळ असे वट वृक्षस्थान। दत्त नगर काया जाण ॥
नामरूपातीत गहन। ब्रह्म शाश्वत अव्यक्त ॥२५॥



ब्रह्मरूप श्रीगुरु मूर्ती। श्रीपादवल्लभ दत्त यती ॥
श्रीनृसिंह सरस्वती। गुरुची काया दत्ताची ॥२६॥

कधीं कधीं गुरु म्हणती। लक्ष्मी स्वगुद धूत होती ॥
नरहरीमाता आंबा होती। अंबा म्हणजे लक्ष्मी ॥२७॥

मात धूतसे सर्व शरीर। बाल संगोपन निरंतर ॥
गुरूच्या बोला अर्थ फार। गुरूभक्तीनें कळतसे ॥२८॥

साधुवाणी अमर शाश्वत। गूढ अर्थ थोर असत ॥
गुरूला साष्टांग प्रणिपात। भावें शुद्ध सदा असो ॥२९॥

गुरु येती प्रज्ञापुरांत। स्वातंत्र्ययुद्ध वर्ष असत ॥
श्रीगुरु चिन्हें दाखवीत। लोक निर्भय जाहले ॥३०॥

वट अश्वत्थ औदुंबर। पूजनें मिळे पुण्य फार ॥
सावित्री आख्यान मनोहर। श्रीगुरुप्रिय सर्वदा ॥३१॥

मद्रनृपेंद्र अश्वपति। त्याला न होतसे संतति ॥
सावित्रीची हवनभक्ति। करी व्रतस्थ राहून ॥३२॥

ब्रह्मयाची घेऊन संमति। सावित्री प्रकटतां नृपति ॥
अतिशय संतोषला चित्तीं। देवी पुसे काय हवें ॥३३॥

राजा सांगे पुत्रकामना। देवी म्हणे नको या क्षणा ॥
होईल कन्या सुलक्षणी। त्यांत आनंद मानावा ॥३४॥

तशी दुहिता रूपवती। झाली सावित्री गुणवती ॥
तिला राजपुत्र लाजती। मागणी नाहीं कन्येला ॥३५॥

अश्वपति सांगे कन्येस। फिरून निवडावे वरास ॥
वृद्ध मंत्रीजन सोबतीस। फिरत येत तपोवनीं ॥३६॥

अंध शाल्वनृपवर। त्यांचा उत्तम दिसे कुमर ॥
सत्यवाना योजी मनीं वर। राजकुटुंब तप करी ॥३७॥

त्यांचें राज्य शत्रू जिंकिती। म्हणून वनीं तप करिती ॥
परंतु मनीं वरनिश्चिती। करी सावित्री घरीं परते ॥३८॥

होते नारद राजसभेंत। म्हणती सत्यवान गुणवंत ॥
पण अल्पायुषी असत। फक्त अेक वर्ष असे ॥३९॥

परंतु सावित्री अढळ। नारद सांगती मंगल ॥
जाऊन वनीं शुभमंगल। झालें सावित्रीसत्यवाना ॥४०॥

सावित्री मनांत झुरत। ब्रह्मा सावित्री वटव्रत ॥
तीन दिवस उपोषित। राहून करी भक्तीनें ॥४१॥

चवथ्या दिवशी पारणा। रात्रीं करूं सांगे वचना ॥
सत्यवान निघे कानना। गेली सावित्री पतीसह ॥४२॥

लाकडें फोडितां घामाघूम। होऊन म्हणे झोंप परम ॥
सावित्री झाली भग्नकाम। म्हणे आज वर्ष भरे ॥४३॥

शिर मांडीवर घेऊन। पतिचित्ता भिनलें मन ॥
इतक्यांत येतसे दिसून। यमधर्म तेथें पातले ॥४४॥

लिंगदेह शरीरातून। काढून यम करी गमन ॥
सावित्री चालली मागून। म्हणे धर्मराज तुम्ही ॥४५॥

यम सांगती जा माघार। ती म्हणे येतें बरोबर ॥
दूतरहित तुम्हीच थोर। पतिसहित मी सुखी ॥४६॥

यम सांगती सत्यवान। बहु धार्मिक पुण्यवान ॥
म्हणून नाहीं दूतागमन। पतिविणें वर सांगावा ॥४७॥

सावित्री नमून मागत। सुपुत्र व्हावे मम तात ॥
वर सत्य यम म्हणत। जावें आतां तूं मागें ॥४८॥

परंतु सावित्री पुढें जात। धर्मशास्त्रबोल वदत ॥
यमधर्म प्रेमें संतुष्टत। सांगती पूर्वी प्रमाणें ॥४९॥

असें चालतां बहु वेळ। सावित्री मागे इष्ट सकळ ॥
सासऱ्यासी दृष्टी निर्मळ। आणि राज्यही पाहिजे ॥५०॥

स्वत:ला मुलगे मागत। शेवटीं यमधर्म सांगत ॥
हवा तो वर माग समस्त। मागे पतिप्राण सावित्री ॥५१॥



यमधर्म सर्व वर देत। राज्य भोगून अंती मुक्त ॥
यम दयाळू गेले परत। सावित्री जागृतीत असे ॥५२॥

पतिप्रेमे होत जिवंत। म्हणे आतां भास्कर गुप्त ॥
कां न केलें मला जागृत। वाट आतां कशी मिळे ॥५३॥

चंद्रमा नभीं उगवून। मार्ग दाखवी वनांतून ॥
आश्रमीं येतां परतून। चिंता-मुक्त माता पिता ॥५४॥

सासऱ्यास दृष्टि येतसे। आनंदें पारणें होतसे ॥
दुसऱ्या दिवशीं आलासे। प्रधान नृपा न्यावया ॥५५॥

शत्रूवर मिळे विजय। प्रजा होत आनंदमय ॥
राजांचा होतसे जय जय। शाल्व नृपति सुखावलें ॥५६॥

तपोवनींचे विप्रजन। पूजिती संतुष्ट राजमन ॥
ब्राह्मण देती आशीर्वचन। जात नगरीं शाल्व नृप ॥५७॥

सावित्री-पिता सपुत्र होत। सावित्री पतिनिष्ठ असत ॥
योग्य काळीं राणी बनत। अंतीं मुक्त भर्त्यासह ॥५८॥

ब्रह्मा-सावित्रीचें पूजन। वटवृक्षमूळीं करून ॥
संसारांत सौख्य भोगून। दंपत्य जातसे मोक्षाला ॥५९॥

ज्येष्ठ पौर्णिमेचा दिवस। वट वृक्षाच्या पूजनास ॥
सकळ देवतांचा वास। असे वडाचे झाडावर ॥६०॥

श्रीक्षेत्र नृसिंहवाडींत। एक विप्र सेवा करीत ॥
पोटशूळ त्याला असत। दृष्टांत देत दत्तगुरु ॥६१॥

अक्कलकोटीं आम्ही यति। तेथें होईल रोग-मुक्ती ॥
पादुका पुजी संतोष चित्तीं। अश्वावरून निघाला ॥६२॥

पूर्वी त्याने केला नवस। दृष्टांत झाला आपणांस ॥
तर ठेवीन पेढे दत्तांस। परंतु ब्राह्मण विसरला ॥६३॥

अक्कलकोटीं ब्राह्मण येत। बाळकृष्ण जोशी विप्रा नेत ॥
चोळाप्पाचे घरीं खेळत। तेव्हां श्रीगुरु प्रेमानें ॥६४॥



तेथें देवाच्या देव्हाऱ्यांत। देवांचे मुखवटे असत ॥
त्यांत धान्य वगैरे भरीत। इतक्यांत विप्र पातला ॥६५॥

खेळांत लाविला औदुंबर। तेथेंच खेळती गुरुवर ॥
अश्वासह द्विज सत्वर। दारांत अडके जातांना ॥६६॥

घोडे ०मागे पुढे सरेना। ब्राह्मणा उपया सुचेना ॥
प्रहर होतां श्रीगुरुमना। करुणा आली भक्ताची ॥६७॥

कृपेनें बोलती वचन। नवस पेढे आल्यावीण ॥
तुझा हय न सुटेल जाण। विप्र मनीं विरमला ॥६८॥

भक्तानें पेढे आणवून। केलें गुरूला भावें नमन ॥
घोडें मागे आले सुटून। लोकां चमत्कार दिसे ॥६९॥

श्रीगुरुनाथा तूं दयाळ। नमूं तुझें पदकमळ ॥
भाव द्यावा प्रेमें निर्मळ। हीच विनंती चरणांसी ॥७०॥

आंत गेला शूली ब्राह्मण। आलिंगी दृढ गुरुचरण ॥
श्रीफल पेढे करी अर्पण। शरण अनन्य जाहला ॥७१॥

एक पितळी मुखवटा। क्षणमात्र विप्राचे पोटा ॥
लावून श्रीगुरु झपाटा। देती व्याधीस विप्राच्या ॥७२॥

मनोभावें गुरु-पूजन। यथाशक्ति विप्र-भोजन ॥
समर्थाचें यश गाऊन। गुरुकृपें तो जात घरीं ॥७३॥

भक्त-त्रास हरावयास। दत्त घेती अवतारास ॥
करून श्रीगुरुसेवेस। सौख्य मिळवोत सर्वही ॥७४॥

नानापरी गुरु खेळत। उन्मत्ता-सम शिव्या घालीत ॥
वेड्यासम चाळे करीत। मात्र बोलतां बोध मिळे ॥७५॥

ज्याचें असे शुद्ध अंतर। त्यासी प्रेमळ गुरुवर ॥
पापी लोक भीती अपार। पातक स्पष्ट गुरु करिती ॥७६॥

शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण। बाबा सबनीस भक्तपूर्ण ॥
गुरुपदीं लागलें मन। सदा चिंतिती श्रीगुरूसी ॥७७॥

अक्कलकोट संस्थानांतून। त्यांना मिळे निवृत्ति-वेतन ॥
त्या योगें निर्वाह करून। होते धार्मिक वृत्तीनें ॥७८॥

श्री माणिक-प्रभु-पदांसी। सेवा करिती त्या वेळेसी ॥
भेटी झाली गुरु-पदांसी। माणिक दत्त-कृपेनें ॥७९॥

मग प्रज्ञापुरीं येऊन। सांगती गुरु येणार म्हणून ॥
तसे येतां नृसिंहभान। सदा स्तवन करीतसे ॥८०॥

श्रीगुरु अक्कलकोटांत। जेव्हां मग समाधि घेत ॥
त्यानंतर कांहीं काल जात। सकाळीं प्रकृति बिघडली ॥८१॥

शुद्धि अखेरपर्यंत। मुखीं नाम-स्मरण असत ॥
दुपारीं बाबा झाले मृत। मुक्तीस गेले गुरुपाशीं ॥८२॥

असे विविध गुरुभक्त। शुद्ध भावानें होती मुक्त ॥
जाति धर्म आड न येत। भक्तां तारिती श्रीगुरु ॥८३॥

सज्जनांचें सदापालन। आणि दुष्टांचें निर्दालन ॥
हें ईश्वरी कार्य महान। ज्ञानें अवतार दाविती ॥८४॥

नीति-मार्ग सदा पाळून। देवास भावें आळवून ॥
राहातां कळवळे भगवान। श्रीगुरु खुणा दाविती ॥८५॥

गुरु जेथें जेथें फिरती। तेथें जे जे धोंडे दिसती ॥
भोळे जन शेंदूर फांसिती। म्हणती देव हा असे ॥८६॥

तेच गुरूला आवडती। त्यांवर मलमूत्र करिती ॥
तेथें वायुरूप असती। जीव त्यांना गति मिळे ॥८७॥

प्रज्ञापुरीं खास बागेंत। गुरु असतां तेथें येत ॥
भक्ति-भावें लोक बहुत। आणि तीन संन्यासी ॥८८॥

माहुरगडींचे राहाणार। अभिमानी घोर भयंकर ॥
पुसती लोकां यतिवर। दंड कां न बाळगिती ॥८९॥

लोकां मारपीट करिती। वादा सत्वरें यावें म्हणती ॥
चोळाप्पाला लोक सांगती। श्रीपाद येत यतींकडे ॥९०॥



पुसे काय मनीं कामना। यति बोलती शब्द उणा ॥
श्रीपाद सांगे त्या तिघांना। यावें श्रीगुरुसमोर ॥९१॥

मग तिघेही स्वामीजवळ। जातां झाले गप्प तत्काळ ॥
सर्व गेली खळबळ। गुरु पहाती त्यांचेकडे ॥९२॥

तिघेही बोलती गोडबोल। आम्ही अमंगल दुष्ट खल ॥
नाहीं झालें ज्ञान निर्मळ। आमचा संन्यास व्यर्थ हा ॥९३॥

तुम्हीच आदिनारायण। निंदा केली परंतु शरण ॥
दाविले कृपेनें चरण। आमचा उद्धार जाहला ॥९४॥

मनोभावें गुरुस्तवन। करीत राहिले आठ दिन ॥
गुरूचें उच्छिष्ट भोजन। करितां कृपा जाहली ॥९५॥

तिघांनाही इष्ट दर्शन। गुरु देती कृपें करून ॥
तिघेही गेले आज्ञा वंदून। मातापूर क्षेत्रासी ॥९६॥

दुष्ट नष्ट खल चांडाळ। गुरुपुढें नम्र तात्काळ ॥
श्रीगुरूचें पदकमळ। सेविती मनोभावानें ॥९७॥

भूत प्रेत पिशाच्चें भारी। लोकां पीडिती त्या नरनारी ॥
श्रीगुरु-सेवा करितां दूरी। पीडा जाई गुरुकृपें ॥९८॥

संसार इच्छा दृढ चित्तांत। असे मनुष्य होतां मृत ॥
वैर साधण्या दुष्ट योनींत। जाती परंतु गुरु तारी ॥९९॥

दृश्य अदृश्य जगतांत। जे जीव त्यांना गुरु तारीत ॥
एकूणसत्तर अध्याय घेत। श्रीगुरु प्रेमें भक्त सुखा ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु



## अध्याय ७० वा

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्रीसद्गुरवे नमः॥

स्वामि समर्थ दत्तावधूत। कीर्ति सर्वत्र पसरत ॥
आळंदीचे सत्पुरुष येत। अक्कलकोटीं गुरूंकडे ॥१॥

दोघे श्रीनृसिंह सरस्वती। दुसरे भक्त योगी यती ॥
गणपतीमंदिरीं उतरती। निघाले श्रीगुरु भेटीला ॥२॥

गुरु सांगती सेवकांसी। व्याघ्रजिन बसावयासी ॥
येथें घाला तें संन्याशासी। बसावयासी योग्य असे ॥३॥

इतक्यांत आले ते यती। नम्रपणें नमस्कारिती ॥
मग गुरु खुणा करिती। आसनीं बसावयाला ॥४॥

मनोहर सुंदर दत्तमूर्ती। पाहून त्यांची झाली तृप्ती ॥
इतक्यांत श्रीगुरु म्हणती। रंडा सोडावी हें बरें ॥५॥

ते यति होते अधिकारी। त्यांना खूण पटे अंतरीं ॥
लीनपणें म्हणती सत्वरीं। तेंच काम चालू असे ॥६॥

त्यांच्या मनीं शंका असती। त्याही सर्व गुरु फेडिती ॥
योग सूत्रार्थें मुदित यती। आळंदीचे भक्त योगी ॥७॥

रंडा म्हणजे सिद्धि असे। तीच त्यांना प्रसन्न असे ॥
योगपूर्तीचे आड येतसे। तेंच सांगती गुरुनाथ ॥८॥

श्रीगुरु स्वकंठीची माळा। घालिती त्या यतीचे गळा ॥
तो परमानंद सोहळा। त्यांची समाधि लागली ॥९॥

गुरुकृपें झालें ब्रह्मज्ञान। मग समाधि उतरून ॥
मंगल आरति होऊन। प्रसाद प्रेमें सर्वां मिळे ॥१०॥

आळंदीस श्री ज्ञानेश्वर। तेथील यति भक्त थोर ॥
वंदून आज्ञें जात माघार। सर्वां नमस्कार असो ॥११॥

प्रसिद्ध झाले ते लोकांत। दिव्य साधु त्यांना म्हणत ॥
महिमा वाढला बहुत। त्यांचा श्रीगुरु कृपेनें ॥१२॥

जनोद्धार सदा करीत। त्यांचे होती पुष्कळ भक्त ॥
त्यांत पुण्याचे महर्षि असत। अण्णाराव पटवर्धन ॥१३॥

ते करिती ईशचिंतन। परोपकारी सदा वर्तन ॥
देशभक्ति मनापासून। त्यांचें प्रेम टिळकांवरी ॥१४॥

भारतीय संस्कृतितिलक। बाळ गंगाधर टिळक ॥
वेदशास्त्रसंपन्न ठीक। ठळक पाश्चात्य विद्याही ॥१५॥

लोकमान्य टिळक बाळ। इंग्रजी सत्तेचे होते काळ ॥
तिच्याविरुद्ध सदाकाळ। कायदेशीर भांडती ॥१६॥

म्हणून इंग्रज म्हणती। असंतोष टिळक निर्मिती ॥
कारागृही त्यांना धाडिती। परंतु धीरोदात्त ते ॥१७॥

मोठ मोठे ग्रंथ लिहिती। राष्ट्रीय संस्कृति दाखविती ॥
जिवाची शिवांत परिणती। प्राप्त असक्त कर्मानें ॥१८॥

ईश्वरावरी हवा भाव। नाहीं कोणाशीं वैरभाव ॥
विश्वात्मरूप आपला ठाव। जीव मिळवी कृष्णबोधें ॥१९॥

पटवर्धन व टिळक - । कार्य परस्पर पूरक ॥
दावी महत्त्व कालफलक। दिव्य दृष्टिनें मार्गे पुढें ॥२०॥

दीक्षा द्यावया साधुजना। अवरतला श्रीदत्तराणा ॥
त्यामुळें अगाध प्रेरणा। लाभून कार्य पसरतसे ॥२१॥

आहार निद्रा भय मैथुन। नैसर्गिक कार्ये करून ॥
सदा राहाती नाना जन। त्यांना दिव्य मार्ग हवा ॥२२॥

मनोविकारांना बंधन। घालून विचार करून ॥
ईश्वरनिष्ठा सदा राखून। स्वकर्म त्याला अर्पावें ॥२३॥

सर्व हिताचा मार्ग उत्तम। तत्त्व आहे निर्दोष सम ॥
तसेंच वर्तन काला सम। ईशचिंतने करावें ॥२४॥

तेंच ब्रह्मार्पण करून। देवाचें देवास देऊन ॥
स्वमन मोकळें करून। राहातां सौख्य लाभतें ॥२५॥



कार्यच ईश्वरास दिलें। आपलें सांगा काय राहिलें ॥
देवालाही हे आवडलें। तारितो भक्तां निःसंशय ॥२६॥

जरी वाटे तत्त्व गहन। तरी हें सोपेंच साधन ॥
साक्षात्कारी साधु सज्जन। त्यांची काया ईश्वराची ॥२७॥

महर्षि अण्णा पटवर्धन। तसे बाळ टिळक सज्जन ॥
श्रेष्ठ विभूति त्यांना वंदन। करितां सतोष गुरुकृपें ॥२८॥

अनेक जन्म येती जाती। पुण्यपापाची जशी गती ॥
भावें करितां ईश्वरभक्ती। श्रीगुरु तारी अभय वरे ॥२९॥

पुण्यमार्गे सुख भोगून। जीव पावती ब्रह्मस्थान ॥
जरी प्रलय जात निघून। तरी पाप्याला न मुक्ती ॥३०॥

गुरुसेवेनें पापें आटती। पुण्यमार्ग सदा फलती ॥
सर्व कांहीं गुरु श्रीपती। त्याला नमस्कार असो ॥३१॥

प्रसिद्ध यशवंत भोसकर। साधुदेव मामलेदार ॥
त्यांच्या स्वप्नीं श्रीगुरुवर। जाऊन शालिग्राम देती ॥३२॥

सांगती होईल फार कीर्ती। प्रपंच परमार्थ साधती ॥
यशवंत जागृत होती। शालिग्राम शिला दिसे ॥३३॥

मग आनंद काय पुसावा। भावें पूजिती त्या माधवा ॥
सरकारी अधिकार वाढावा। यांत आश्चर्य न कांहीं ॥३४॥

यथासांग शिलापूजन। अतीथी अभ्यागतसन्मान ॥
पण दिंगबरांकडे ध्यान। कुठें बाबा भेटतील ॥३५॥

गुरुस्वप्नीं सांगती त्यांसी। वसतो अक्कलकोटासी ॥
यावें झडकर तूं भेटीसी। अरे सखया यशवंता ॥३६॥

जागृत झाले यशवंत। अक्कलकोटा जाती त्वरित ॥
श्रीगुरु चोळाप्पाचे घरांत। पहातां स्वप्नमूर्ति दिसे ॥३७॥

भावें घातला नमस्कार। प्रेमें पुसती यतिवर ॥
शिला कोठें खूण सत्वर। पटे शिला दाखविली ॥३८॥



भक्त म्हणे श्री शालिग्राम। दिला स्वप्नीं प्रसाद उत्तम ॥
कृपा दाविली अनुपम। श्रीगुरु आपुली प्रेमानें ॥३९॥

अपार केलें भावें स्तवन। गुरुपूजन विप्रभोजन ॥
यथाशक्ति सेवा करून। नमन भावें भक्त करी ॥४०॥

श्रीगुरु देती आशीर्वचन। भक्तावर गुरु प्रसन्न ॥
जात परत विप्र निघून। मामलेदार ते जाहले ॥४१॥

कीर्ति पसरली अपार। मग सोडून अधिकार ॥
गृहस्थाश्रमीं सदाचार। पाळून सुखें रहाती ॥४२॥

नाशिक क्षेत्र गोदातीर। प्रसिद्ध देव मामलेदार ॥
साधून कीर्ति इहपर। गेले स्वानंदीं गुरुकृपें ॥४३॥

त्यांना भावें असो नमन। कृष्णस्वामि करवीर स्थान ॥
गुरुदत्तकृपा गहन। तसे पुण्याचे काळ बुवा ॥४४॥

आणि रामानंद बीडकर। साईबाबा वेष फकीर ॥
नाना स्थानीं भक्त इतर। त्यांना नमस्कार असो ॥४५॥

विष्णुपंत गोखले ब्राह्मण। मुंबापुरीस त्यांचें स्थान ॥
सत्पुरुष दिव्य विद्वान। विष्णुबुवा ब्रह्मचारी ॥४६॥

एक पारशी त्यांचे सहित। अक्कलकोटा भावें येत ॥
गांवाबाहेर प्रज्ञापुरांत। राम मंदिरी गुरु होते ॥४७॥

तेथें गेले गुरुदर्शनासी। नमन केलें श्री समर्थांसी ॥
बुवा योजिती कांहीं मानसीं। गुरु वेदांत पुसोत ॥४८॥

स्वामि समर्थ हें जाणून। म्हणती तुम्ही कोण विद्वान ॥
कां धरिला विद्याभिमान। बंधनकारी सर्वथा ॥४९॥

बुवांना पटे मनोमन। गुरु अवतारी पूर्ण ॥
हंसत गेले संशयी मन। सांगे कांहीं किंतु दिसे ॥५०॥

फलाहार करून झोंपती। खूप विंचू स्वप्नीं चावती ॥
ओरडत ते जागे होती। परंतु वेदना तशाच ॥५१॥

बुवांचा आक्रोश ऐकून। जागे झाले सगळे जन ॥
ते पाहाती दिवा लावून। पण विंचू न दिसती ॥५२॥

तेव्हां लोक म्हणती त्यांसी। भितां स्वप्नींच्या विंचवांसी ॥
आश्चर्य वाटतें आम्हांसी। तुम्हां साधु म्हणताती ॥५३॥

मग बुवांना कल्पना आली। गुरुशंका मनीं धरिली ॥
त्यामुळें हा त्रास या काळीं। तत्क्षणीं वेदना थांबल्या ॥५४॥

बुवा गुरूंना मनीं चिंतिती। गुरु पूर्ण ब्रह्म असती ॥
दुसऱ्या दिवशीं दर्शना जाती। सांगती नमून आदरें ॥५५॥

ऐकून दत्त यति म्हणती। सत्पुरुष तुम्हां मानिती ॥
स्वप्नांत वृश्चिक दंशिती। कां मानिलें दुःख त्याचें ॥५६॥

नंतर चोळाप्पाकडून। आणविती विहिरीमधून ॥
उदकें कलश भरून। स्वतः देती बुवांकडे ॥५७॥

गुरु म्हणती समजा यांत। बुवांना त्याची खूण कळत ॥
गुरुपदीं निःशंक चित्त। ठेवून आनंदी असावें ॥५८॥

ब्रह्मांडांत तेंच देहांत। सर्व कांहीं एक असत ॥
गुरुआज्ञा प्रसाद मिळत। मुंबईस गेले बुवा ॥५९॥

बुवा कांहीं ग्रंथ लिहिती। उपदेशून मार्ग दाविती ॥
लोक सन्मार्गा लागती। बुवाही तरती गुर-कृपें ॥६०॥

नमस्कार श्रीगुरुनाथा। गुरुचरणीं असो माथा ॥
गुरुप्रेरणाच या ग्रंथा। वय पंचवीस असतांना ॥६१॥

दिव्य ओवी मना दिसली। तेव्हां माहिति संपादिली ॥
वय साठांत गुरुजवळी। ग्रंथ-लेखन होतसे ॥६२॥

अमृत-घट स्वीकारीं। दत्तचरित्रसार करीं ॥
विश्वासें तरती नरनारी। शंक येथें धरूं नये ॥६३॥

श्रीनरसिंह सरस्वती। तेच नृसिंहभान यती ॥
श्रीपाद श्रीवल्लभ मूर्ती। श्री माणिक दत्त गुरु ॥६४॥



दत्तचरित्र घट अमृत। पान करा हो जन समस्त ॥
सर्व स्वतंत्र आत्मतत्त्व। परमात्माच श्रीगुरु ॥६५॥

त्याला करावें भावें नमन। तोच दावील मार्ग छान ॥
सर्वाचेंही सुख इच्छून। संतुष्ट बनावें संसारीं ॥६६॥

सर्वही असे ईश्वराचें। आपणही स्वरूप त्याचें ॥
या जन्माच्या क्षुद्र सुखाचें। मना बंधन नसावें ॥६७॥

अनंत जन्म आजवर। दुर्लभ हें नर-शरीर ॥
नको छलन अविचार। सुविचारें श्रीगुरुनिष्ठ व्हा ॥६८॥

सुख दुःख सर्व मिळून। बनतसे संसार जीवन ॥
त्याचें त्याला सर्व अर्पून। होत आनंद गुरुसेवें ॥६९॥

असे होऊन सुखरूप। शांत वाटतो संसार-सर्प ॥
आत्मानंद सुख अमाप। श्रीगुरु तुला नमन असो ॥७०॥

दत्त-चरित्र असे अमृत। दृश्य अदृश्य योनी बहुत ॥
त्याही सद्गतीस लागत। त्रिविध ताप निरसती ॥७१॥

एक गोसावी तप करी। श्रीदत्त पहावे डोळे भरी ॥
दत्तात्रेय गुरु गिरनारीं। दर्शन व्हावें प्रत्यक्ष ॥७२॥

पण हेतु नाहीं सफळ। फिरत आला गुरूजवळ ॥
नमस्कारी गुरुपदकमळ। आणि उभा राहिला ॥७३॥

स्वामि समर्थ रूप धरिती। श्रीगुरुदत्त त्रयमूर्ती ॥
गोसावी पाहून गुरु मूर्ती। आनंदें तल्लीन होतसे ॥७४॥

अति दुर्लभ तें दर्शन। होतां करी साष्टांग नमन ॥
सप्रेमें अपार स्तवन। कृतार्थ भावें करीतसे ॥७५॥

आपण दत्त होऊन नर। करितां सदा जगदुद्धार ॥
अक्कलकोटीं बुद्धिनगर। आपुल्या लीलें क्षेत्र बने ॥७६॥

श्रीगुरु सप्रेम सांगती। जावें माहुर क्षेत्राप्रती ॥
सर्वत्र अपार स्वामि-कीर्ती। गोसावी पूर्ण दत्त कृपें ॥७७॥



इचलकरंजी संस्थान। तेथील विद्वान ब्राह्मण ॥
दशग्रंथी आचारवान। श्रीपाद जोशी नांवाचे ॥७८॥

प्रज्ञापुरीं एकदां आले। श्रीगुरूला भावें नमिलें ॥
कांहीं दिन तेथें राहिले। सांगती त्यांना श्रीगुरु ॥७९॥

तुम्ही आतां काशीस जावें। तीन मासांनी परत यावें ॥
जोशी तसेंच करिती भावें। घेत विश्वेश-दर्शन ॥८०॥

मंत्र-जागर तेथें ऐकती। जाडे विद्वान तेथें असती ॥
जोशांना मान कोणी न देती। तरीही जोशी संतुष्ट ॥८१॥

एकदां झाला चमत्कार। श्रीनरसिंह यतिवर ॥
हात ठेवून कटीवर। प्रसन्न मुखें उभे होते ॥८२॥

विश्वेश्वर मंदिराजवळ। नमिती त्यांना लोक सकळ ॥
श्रीपाद जोशीही प्रेमळ। गुरुला भावें वंदिती ॥८३॥

पुसती होतां प्रज्ञापुरासी। केव्हां आलांत या स्थळासी ॥
गुरु दयाळ प्रिय भक्तासी। सांगती सर्वत्र राहतों ॥८४॥

तथापि आलों तव कार्यास। आज मंत्र म्हणावयास ॥
जावें अैकतां जोशी गुरूस। नमन करून निघाले ॥८५॥

पट्टीचे विद्वान मंत्र म्हणत। तेथें श्रीपाद जोशी जात ॥
मंत्र म्हणून दाखवीत। चुक तेथील विप्रांच्या ॥८६॥

काशीची ब्राह्मण मंडळी। सन्मान करिती त्यावेळीं ॥
जोशी स्मरती गुरुमाउली। म्हणती गुरो ही तवकृपा ॥८७॥

काशी क्षेत्रीं मान पावले। विश्वेश्वर प्रसन्न झाले ॥
श्रीपाद भट्ट पुन्हां आले। अक्कलकोटी श्रीपदीं ॥८८॥

नमून केलें निवेदन। जें जें तेथें आलें घडून ॥
भक्तिभावें भरलें मन। प्रेमें पूजन श्रीगुरूचें ॥८९॥

गुरुनाथ होते प्रज्ञापुरीं। भक्तासाठी काशी नगरीं ॥
प्रकटून भक्त महिमा भारी। वाढवून गुप्त जाहले ॥९०॥

श्रीपाद जोशी पुण्यवंत। त्यांना गुरूचा प्रसाद होत ॥
गुरुला पूर्ण ओळखत। जाती आपुल्या घरासी ॥९१॥

यथा काळीं देह सोडून। झाले श्रीदत्त चरणीं लीन ॥
गुरूसह त्यांना नमन। भक्ति भावें नित्य असो ॥९२॥

जे ब्रह्म साक्षात्कारी झाले। तेथें भेदभाव जिराले ॥
सम निर्दोष ब्रह्म सगळे। ब्रह्मार्पणें तें मिळतसे ॥९३॥

गाणगापूरचे पूजारी। येती श्रीपदीं प्रज्ञानगरीं ॥
कथिती स्वामि भक्त-कैवारी। तेथून निघतां सांगितलें ॥९४॥

गाणगापुरीं गुप्त वस्ती। त्या वचनीं विश्वास चित्तीं ॥
ठेवून वागावें भाव भक्तीं। इकडे येणें नसावें ॥९५॥

तेव्हांचे बोल सत्य असती। पूजारी आनंदले चित्तीं ॥
गुरुचरण मठीं ठेविती। श्री शैल पर्वतीं जातांना ॥९६॥

ते नरसिंह सरस्वती। अक्कलकोटी शेवटीं येती ॥
पूजाऱ्यासी खुणा दाविती। त्यांना नित्य नमस्कार ॥९७॥

गुरु नृसिंह जेथें फिरले। तेथें अक्षय सदा राहिले ॥
त्यांचे चरण आधार भले। वाटती भावें सद्भक्तां ॥९८॥

जरी गुरु सर्वत्र असती। तरी नरदेहें जेथें जाती ॥
तेथें लाभते दिव्य प्रचीती। भक्तीनें सौख्य इहपर ॥९९॥

श्रीगुरु तुझी लीला गहन। सत्तरावा अध्याय पूर्ण ॥
करितां गुरुराया अर्पण। दत्त प्रसन्न भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु



# अध्याय ७१ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

श्री नृसिंहभान गुरु यती। श्रीपाद नृसिंह सरस्वती ॥
भान सरस्वती ज्ञान कांती। उद्धार करिती भक्तांचा ॥१॥

यतिवर प्रज्ञापुरासी। टेकडीवर एके दिवशीं ॥
बसले होते आनंदेसी। लोकही येती दर्शना ॥२॥

वीस वर्षांची वेश्या सुंदर। भ्रष्ट करावें गुरुशरीर ॥
म्हणून धाडिती दुष्ट नर। वेश्या वंदन करितसे ॥३॥

राधेनें फलादिक अर्पिलें। कपटें गायन आरंभिलें ॥
हाव भाव नखरे भले। करून बोलूं इच्छीतसे ॥४॥

परंतु शुद्ध नुमटती। लांबून दुष्ट खल पाहती ॥
श्रीगुरु निर्विकार दिसती। पुसती जाणून चित्त तिचें ॥५॥

काय भेद गे स्त्रीपुरुषांत। राधा अधोमुख विरमत ॥
परंतु योनी स्तन स्त्री प्रत। पुरुष देह भिन्न म्हणे ॥६॥

ऐकून श्रीगुरु सांगती। कार्यकारणा भेद दिसती ॥
अभेद पुरुष प्रकृती। सर्वत्र जाण परमात्मा ॥७॥

तरी तुझे तूं अवयव। ब्राह्मणांस द्यावें वैभव ॥
आणि होऊन निरवयव। जावें ब्रह्मस्थानासी ॥८॥

गुरुला पाहून त्यावेळी। गणिका भयभीत जाहलीं ॥
करुणा भाकी वेळोवेळीं। नमून क्षमा मागतसे ॥९॥

चमत्कार झाला तत्काळ। त्या वेश्येचे स्तन मांसल ॥
विषयविकारदलाल। जिरून गेले पूर्णपणें ॥१०॥

कामवासना मावळली। गुरुदुष्टांस भीति झाली ॥
यतिनिंदा सोडून दिली। छलक नमिती श्रीगुरुला ॥११॥

श्रीगुरु नरसिंह यती। काशी मथुरा क्षेत्रां प्रती ॥
करून यावें तिला सांगती। गणिका तशी जातसे ॥१२॥



सदा वापरी वस्त्रे श्वेत। कामविकारें तिचें चित्त ॥
श्रीगुरुचरणीं लागत। त्यामुळेंच ती उद्धरली ॥१३॥

श्रीगुरु तुझी अगाधकला। सर्वां लाविसीभक्ति मार्गाला ॥
ज्याचा भाव तुम्हां जडला। तो तो तरला निश्चयानें ॥१४॥

जो जो असतों जसा जसा। श्रीगुरु त्याशीं तसा तसा ॥
सर्वांस सदा भरंवसा। असे सद्गुरु दत्तांचा ॥१५॥

विविध देशांचे लोक येत। श्रीगुरूला शरण जात ॥
त्यांच्या इच्छा गुरु पुरवीत। असे सद्गुरु कृपाळु ॥१६॥

श्रीगुरु देशमुख वाड्यांत। कधीं कधीं होते बसत ॥
तसे एकदां असतां येत। एक यवन दर्शनाला ॥१७॥

सुंदराबाई शिवूबाई। सेवक बाबा यादवही ॥
वामनबुवा वगैरे कांहीं। भक्तमेळा जवळ असे ॥१८॥

यवन जमादार विचारी। अक्कलकोट गुरु स्वारी ॥
कोठें असे सांगा लौकरी। दर्शना येथें मी आलों ॥१९॥

प्रेमें सांगती गुरुराज। अक्कलकोटीं ते विराज ॥
तेथेंच पहावे सहज। म्लेंछ स्वस्थ प्रहरभर ॥२०॥

समाधि लागली यवनासी। लोक चकित होत मानसीं ॥
स्वामि विलोकिती म्लेंछासी। देहभाव त्या येतसे ॥२१॥

पाही नजर उघडून। तर अंतर्बाह्य भगवान ॥
यावनी भाषेंत स्तवन। करी नृसिंह यतींचें ॥२२॥

गोसावी साधु संत महंत। भेटले साई फकीर बहुत ॥
कुराण धर्मग्रंथ पठत। परंतु आत्मज्ञान नसे ॥२३॥

अल्ला खुदा प्रभु दुनियेंत। अलमस्वामि दत्त दिसत ॥
आणलेले पदार्थ समस्त। भक्तिभावें अर्पितसे ॥२४॥

वृद्ध यवन जमादार। सद्भावें करी नमस्कार ॥
दुसऱ्या दिवशी यतिवर। आज्ञा देती जावयासी ॥२५॥

मग आपल्या घरी जाऊन। करी भावें गुरुस्तवन ॥
लोकांसही सत्य सांगून। गुरुकीर्ति पसरीतसे ॥२६॥

गुरु वाटेल तेथें जाती। - राजा पासून रंकाप्रती ॥
मशिदी दर्गेही आवडती। तेथें मोडतोड शौचविधि ॥२७॥

एकदां म्लेंछ खवळले। शिक्षा करण्या येऊं लागले ॥
घरीं त्यांच्या आकांत चाले। माघार घेती भिऊन ॥२८॥

त्यांतील म्हातारा यवन। सांगे गुरु अवलिया पूर्ण ॥
श्रीगुरूशीं सर्वही लीन। कोणी कांहीं न बोलती ॥२९॥

प्रज्ञापुराचे आसपास। गुरु फिरतां एक वेळेस ॥
गौडगांवी डसें बैलास। सर्प त्यामुळें बैल मेला ॥३०॥

गुरु सांगती गौडगांवासी। चला जाऊया या वेळेसी ॥
जवळचे लोक श्रीगुरूसी। म्हणती गांव दूर असे ॥३१॥

गुरु कोणाचें न ऐकती। हवे तेथें जाऊं म्हणती ॥
आम्हां भक्तांची असे प्रीती। आणि चालले गौडगांवा ॥३२॥

मग सेवकही धांवती। पोंचले गौड गांवाप्रती ॥
मृत बैलास गुरु म्हणती। अरे तूं आतां उठावे ॥३३॥

बैल सत्वर जिवंत होत। सर्वज्ञ आश्चर्यचकित ॥
लोक भावें करिती स्वागत। गूढ लीला श्रीगुरूची ॥३४॥

गुरु पालखींत बसती। लोक फिरावयास येती ॥
कधीं भक्तांना श्रम होती। पालखी वाहात असतांना ॥३५॥

मग गुरु दयाळु होती। कापसासम हलु बनती ॥
भक्तलोकही आनंदती। ओझें न वाटे मुळींच ॥३६॥

कधीं फिरत असतांना। अन्नही न मिळे सेवकांना ॥
भक्त येती लांबून दर्शना। समाराधना होतसे ॥३७॥

कधीं कधीं असेंही होई। स्त्रीरूपें अन्नपूर्णा येई ॥
साध्या स्त्रीसम वेष घेई। आणि पुरवी भोजना ॥३८॥



गुरुनाथाच्या खूप लीला। वेळोवेळीं अपार झाल्या ॥
महिमा न कळे कोणाला। श्रीगुरु समर्थ कृपाळु ॥३९॥

अक्कलकोट संस्थानासी। देखरेख करावयासी ॥
बंबगार्डन इंग्रजासी। नेमी इंग्रज सरकार ॥४०॥

त्यांचे पायांस गोम चावे। विष देहीं न पसरावें ॥
म्हणून शस्त्रें तें काढावें। ठरवून विष तें काढिलें ॥४१॥

परंतु जखम होईना बरी। त्यामुळें त्रास बहुत परी ॥
एकदां तिकडे श्रीगुरु स्वारी। जातां आदरी साहेब ॥४२॥

श्रीगुरूसी भावें नमिलें। स्वामी कांहीं शब्द बोलले ॥
ते साहेबास न कळले। श्रीगुरु गेले निघून ॥४३॥

साहेब सांगे कारभाऱ्यासी। कारभारी पुसे चोळाप्पासी ॥
चोळाप्पा विनवी श्रीगुरुसी। उपाय काय दयाळा ॥४४॥

आळवाचे कांदे भाजून। खावे तांदुळाचे धुवणांतून ॥
लेप पाण्यांत झरवून। करणें कडुनिंब खोडाचा ॥४५॥

गुरु-भक्ता लत्ता-प्रहार। त्याच पाया जखम सत्वर ॥
साहेब लीन मग गुरुवर। सांगती औषध कृपेनें ॥४६॥

तीन वर्षे दु:ख भोगिलें। पायानें लंगडे जाहले ॥
असें दु:ख समूळ गेलें। साहेब भक्त श्रीगुरुचे ॥४७॥

गुरु अशीं औषधें सांगती। लोकांचे रोग बरे होती ॥
कृपाकटाक्षें रोग जाती। औषधी लीला श्रीगुरुची ॥४८॥

भक्त साधुसंत महंत। सिद्धि-कळा त्यांस लाभत ॥
अतर्क्य कामेंही ते करीत। पण पूर्णत्त्व तेथें नसे ॥४९॥

पुण्याई संपून परत। इतर लोकांसम बनत ॥
म्हणून सिद्धि फसवीत। आत्मज्ञान मिळवितांना ॥५०॥

जे आत्मसाक्षात्कारी झाले। त्यांना कसले बंध नुरले ॥
नि:संग निरिच्छ देखिले। परोपकारी सर्वदा ॥५१॥



त्यांचें देह-प्रारब्ध जरी। बरें वाईट कर्म करी ॥
तरी त्याचें बंधन दूरी। आपोआपच होतसे ॥५२॥

देहकर्माचें देहफळ। भोगील सदाकाळ ॥
आत्मज्ञान प्रकाश निर्मळ। त्यांत डुल्लत तो असे ॥५३॥

देहाचें सुख दु:ख त्याला। मुळींच नसे तो निराळा ॥
अशा साधूच्या वर्तनाला। कोण जाणील पूर्णपणें ॥५४॥

आत्मज्ञानी जे जीवन्मुक्त। ते देहकर्म संपवीत ॥
लोकां लावण्या धर्म रीत। कांहीं कार्य ते करिती ॥५५॥

अशांची सत्ता सृष्टीवर। आम्हां दिसती चमत्कार ॥
परंतु आत्मज्ञानी नर। त्यांचें कार्य सहज घडे ॥५६॥

त्यांचा सन्मान अपमान। दोन्ही वाटती त्यांना समान ॥
आत्मज्ञानी अमर जन। एकच सर्व त्यांना नमूं ॥५७॥

नाना साधनें साध्य केलीं। छायाविहीन काया केली ॥
तरी साधना अपूर्ण ठरली। अशी उदाहरणें पुष्कळ ॥५८॥

नाना देवांची भक्ति केली। पण तीही लहान ठरली ॥
श्रीगुरु सर्वांची माउली। साउली त्यांची पाहिजे ॥५९॥

मग सर्व संकटांतून। भक्त जातसे सदा तरून ॥
गुरुराया तुला नमन। तुमची कृपा असूं दे ॥६०॥

गुरु आणि देवही दत्त। माया चैतन्य एकच दत्त ॥
देहादि माया जीवदत्त। परमात्माही दत्त गुरु ॥६१॥

त्यांचा अवतार प्रज्ञापुरीं। तसा आपल्या बुद्धिनगरीं ॥
जीव शिवातें नमस्कारी। आत्मा बने परमात्मा ॥६२॥

अक्कलकोट शहरांत। एक दीन मुका असत ॥
गुरु-दर्शन रोज घेत। शुद्ध मनोभावानें ॥६३॥

स्वामीपुढें टाळ्या वाजवी। आणि सुंदर नाचही दावी ॥
गुरुरायाची वाणी बरवीं। करी बोध मन्याबाला ॥६४॥

गुरुमहाराज गुरु। जयजयपरब्रह्म सद्‌गुरु ॥
तेव्हां जाहला चमत्कारू। मुका मन्याबा मंत्र म्हणे ॥६५॥

गुरु-कृपें बोल फुटून। आनंदें करीतसे भजन ॥
गुरुराया तुला नमन। लीला गाऊन भक्त तरे ॥६६॥

अक्कलकोटी राजवाड्यांत। कधीं कधीं श्रीगुरु जात ॥
झोपाळ्यावर गुरु बसत। एकदां येतसे पूजारी ॥६७॥

नृपतीच्या देवघरांत। उंदीर सदा त्रास देत ॥
अक्षता वगैर ते खात। पूजारी फार रागावे ॥६८॥

तेथें त्याला दिसे उंदीर। दिव्याची वात पळवी दूर ॥
गंधाचें खोड मूषकावर। क्रोधें तेव्हां भिरकावी ॥६९॥

उंदराचें संपलें जीवन। पूजारी बोहर ये घेऊन ॥
यतिवर घेती ठेवून। आणि जिवंत त्या केला ॥७०॥

राज-हत्ती प्रज्ञापुरांत। एकदां जाहला उन्मत्त ॥
तेथील बुरुज मोडीत। आणि दगड फेंकीतसे ॥७१॥

जो कोणी त्या मार्गे जातसे। त्यावर धोंडा मारीतसे ॥
राजमार्ग बंद होतसे। सरकार करी विचार ॥७२॥

साखळदंडही तोडिला। भक्कम खांबही मोडिला ॥
तरी ठार करणें याला। बंदूक गोळी झाडून ॥७३॥

इतक्यांत श्रीगुरु सशिष्य। तिकडे निघाले अवश्य ॥
जिवाशेनें श्रीगुरु-शिष्य। मागेंच पाय काढिती ॥७४॥

गुरु उभे राहिले स्थिर। हत्तीकडे केली नजर ॥
वेगें बोलती गुरुवर। कारे हत्ती माजलासी ॥७५॥

पूर्व-स्मरण नाहीं काय। अरे रहावें शांतिमय ॥
सर्व लोकांस पीडा होय। अशा तुझ्या वर्तनानें ॥७६॥

वगैरे श्रीगुरु बोलत। हत्ती झाला शरणागत ॥
वारंवार श्रीगुरुप्रत। वांकून नमस्कार करी ॥७७॥



उन्मत्त गज झाला शांत। कोणा उपद्रव न देत ॥
सर्वही आश्चर्य-चकित। गुरु-लीलेनें जाहले ॥७८॥

बंब गार्डन साहेबांशी। वानरी होती सुंदरशी ॥
नामही पडलें तिजसी। सुंदरी असे नंतर ॥७९॥

मर्कटी चेष्टा करी फार। लोकांस चावे वारंवार ॥
साहेबासही निरंतर। ती त्रास देऊं लागली ॥८०॥

नंतर तिला मारण्या ठार। हुकूम निघाला सत्वर ॥
तिच्यासह येती नोकर। देवळामागे मारण्याला ॥८१॥

तेथें खंडोबा मंदिरांत। तेव्हां स्वामि समर्थ असत ॥
भुजंगा भक्त त्यांना पुसत। आणूं काय सोडवून ॥८२॥

आण म्हणतां योगेश्वर। भुजंगा निघाला सत्त्वर ॥
सेवकां सांगे लवकर। मारूं नका वानरीला ॥८३॥

साहेबाचे आज्ञेवरून। वानरीला येत घेऊन ॥
गुरु बोलती गोड वचन। चेष्टा टाकून दे आतां ॥८४॥

नातरी तुझे प्राण जातील। व्यर्थ मर्कटे मरशील ॥
वानरी सद्‌गुणी तत्काळ। होऊन बसली गुरुभक्त ॥८५॥

नित्य दोन वेळ नमन। श्रीपदीं पालथें पडून ॥
आपले हातही जोडून। मनोभावानें ती करी ॥८६॥

सर्व स्थळीं असे फिरत। कोणा उपद्रव नसत ॥
लोकही तिला मान देत। श्रीगुरुकडे अन्न मिळे ॥८७॥

श्रीगुरु स्वकंठीची माळा। प्रेमें घालिती तिच्या गळां ॥
तिच्या डोकीस वेळोवेळां। स्वत:ची टोपी घालिती ॥८८॥

वानरीचें भाग्य उत्तम। म्हणून श्रीगुरु पुरुषोत्तम ॥
तिच्यावर करिती प्रेम। श्रीगुरु सर्वांस सारखे ॥८९॥

चिमण्या गुरूला आवडती। गुरु लोकां सेवा सांगती ॥
अन्न पाणी गोमाते-प्रती। घाला श्वानास वगैरे ॥९०॥



भक्त कामे पार पडती। श्रीगुरुकृपा सर्वांवरती ॥
सर्वांचे उपयोग असती। माहिती मात्र पाहिजे ॥९१॥

गो-पूजक जरी यवन। तरी तो जाईल उद्धरून ॥
गोदुग्ध अमृत जीवन। गोसेवका कृष्ण रक्षी ॥९२॥

गोपति बैल उत्तम। योग्य करिती शेतकाम ॥
नंदी वाहन प्रियतम। शिवा पशुपति नांव असे ॥९३॥

गोमाता गणेशा आवडते। मलमूत्रें रोग पळविते ॥
खतें उत्तम पीक येतें। गाय गरीब साबडी ॥९४॥

सूर्य-किरण गोमातेंत। शिरून जंतु-नाश करीत ॥
कपिला गाय सर्व गाईत। आरोग्यकारक उत्तम ॥९५॥

सर्व देवता गाईत असती। तिला करावी भावें प्रणती ॥
गायत्री देवी पूज्य अती। राहाती श्रीकृष्ण गोलोकीं ॥९६॥

गाय म्हणजे कामधेनू। नसे संशय अनुमानू ॥
कोणी भावें भजती धेनु। त्यांसी ईश्वर प्रसन्न ॥९७॥

गाय उत्तम जनावर। दत्त-गुरूला प्रीती अपार ॥
सर्व लोकांस आवडे फार। गोरक्षण क्षेम करी ॥९८॥

हवा-शुद्धि ज्ञान आरोग्य। गो-सेवेनें येतसे भाग्य ॥
इहपरही सौख्य योग्य। धेनु-कृपेनें लाभतसे ॥९९॥

नृसिंह माणिक सद्‌गुरु। ठेविती सर्वदा कृपा-करू ॥
एकाहत्तर अध्याया आदरू। करिती भगवंत श्रीदत्त ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु

## अध्याय ७२ वा

श्री गणेशाय नम:। श्री सरस्वत्यै नम: । श्रीसद्गुरवे नम:॥

श्री नरसिंह सरस्वती। मंगळवेढीं त्यांची वस्ती ॥
एकदां ते दिगंबर यती। माणिक नगरीं पातले ॥१॥

नूतन अवतार श्रीदत्त। श्री माणिक प्रभु असत ॥
योगलीला त्यांची अद्भुत। सद्गुरु स्वच्छंद वर्तती ॥२॥

संगमाकडे धर्मशाळेत। कांहीं दिवस श्रीगुरु स्थित ॥
वृक्षबीज वृक्ष बनत। श्रीगुरुचरित्रवाचनें ॥३॥

श्रीगुरु व माणिक दत्त। अेका आसनींच बैसत ॥
त्यांत द्वैतभाव नसत। कार्याकारण भिन्न वपु ॥४॥

श्रीगुरु प्रभूंना भेटती। माणिक सद्गुरु श्रीपती ॥
दोघेही दत्तात्रेय मूर्ती। त्यांना नमस्कार असो ॥५॥

त्यानंतर दोन वर्षात। उत्तर भारतीं युद्ध होत ॥
देशी राजे देशार्थ लढत। किरकोळ युद्ध दक्षिणी ॥६॥

त्याचें निमित्त उकरून। हुमणाबादेस यवन ॥
तालुकादार त्रासवी जन। माणिक नगरीं छळ करी ॥७॥

प्रभूंना कांहीं कोणी न पुसे। लोकांचा मात्र छळ होतसे ॥
इतक्यांत साहेब येतसे। चौकशी साठीं इंग्रज ॥८॥

तोही बारीक तपास करी। म्हणजे माणिकमहत्त्व भारी ॥
संशय कसलाही न धरी। प्रभुशिष्य त्याला सांगती ॥९॥

तालुकादार छळी लोकांस। साहेबाचेही ये नजरेस ॥
वर लिहून घालवी त्रास। तालुकादार झाला कमी ॥१०॥

देशपांडे खंदारकर। जणूं गांवचे सरकार ॥
सुस्वरूप त्याचा कुमर। संगत तमाशेवाल्याची ॥११॥

हुषार सुंदर कंठ मधुर। स्त्री वेषानें नाचत फार ॥
लोकां नावडे हा प्रकार। बहिष्कार पडे जातीचा ॥१२॥



त्रासून माणिकदरबारांत। येऊन सांगे हकिकत ॥
नृत्य गायन नाद न जात। तारावें मज गुरुवरा ॥१३॥

माणिक प्रभु ठेवून घेत। कृष्ण भक्तीचा छंद लावीत ॥
नाना नाच्या दंग बहुत। कृष्णभक्ति वाढतसे ॥१४॥

जातीचे लोक तक्रार नेती। श्री जगद्गुरु बोलाविती ॥
नाना जाऊन पायां पडती। दावी कौशल्य नाचाचें ॥१५॥

नाच गोड गायन मधुर। धार्मिक वृत्तीचा बहर ॥
जगद्गुरु तोषती अपार। म्हणती सार्थक जन्माचें ॥१६॥

ज्याचा त्याचा कल पाहून। माणिक घेती सुधारून ॥
गायन नर्तन वर्तन। कृष्णभक्तींत सामावें ॥१७॥

ही सद्गुरु कृपा गहन। प्रभुप्रेमें शिष्या धरून ॥
कधीं टाकीत नाहीं म्हणून। भक्त नि:शंक विश्वासती ॥१८॥

विठ्ठलराव तालुकदार। नम्र प्रभुपदीं निरंतर ॥
कारकून गरीब संसार। सत्ता श्रीमंती प्रभुकृपें ॥१९॥

विठ्ठलराव कारकून। एकदां विषप्रयोग होऊन ॥
मरणोन्मुख असतां पूर्ण। दंपत्य प्रार्थी प्रभुराया ॥२०॥

बैरागी येतसे दारांत। भस्मचिमटी प्रसाद देत ॥
तीर्थ करून औषध पीत। विठ्ठलराव झाले बरें ॥२१॥

कुठें ही न सांपडे बैरागी। इकडे हिरवे माणिक योगी ॥
मंडळी सर्व चिंतावेगीं। औषध दिधलें वैद्याचें ॥२२॥

वैद्य प्रकृति बिघडून। होतसे आसन्न मरण ॥
प्रभूंना औषध देऊन। आपण झालों दोषी म्हणे ॥२३॥

प्रभुपदीं पाठवी सांगून। अपराध क्षमा करून ॥
द्यावें मजला जीवदान। प्रभूंनीं तीर्थ पाठविलें ॥२४॥

वैद्यास मिळालें आरोग्य। विठ्ठलरावांचे महाभाग्य ॥
प्रभुकृपा त्यावर योग्य। प्रभुभेटीस येतसे ॥२५॥



कथी सकळ इत्यंभूत। माणिक प्रेमानें सांगत ॥
आम्हां विषप्रयोग होत। दाखवा बैरागी आम्हांसही ॥२६॥

विठ्ठलराव शरणागत। प्रभु म्हणती आम्हीच येत ॥
विष आमच्या अंगीं असत। धांवा ऐकून येणें घडे ॥२७॥

प्रभुकृपें नोकरीवर। विठ्ठलराव तालुकदार ॥
प्रभु करिती स्वच्छ शरीर। भक्तकष्ट प्रभु घेती ॥२८॥

विठ्ठलरावसौभाग्यवती। तिला प्रभूची निस्सीम भक्ति ॥
प्रभुकृपें तरे दंपती। जय माणिक दत्त प्रभु ॥२९॥

भालचंद्र दीक्षित जे भक्त। मुलगा यज्ञेश्वर दीक्षित ॥
त्याकडून यज्ञ घडत। माणिकनगरीं उत्तम ॥३०॥

नारायण भालचंद्र दीक्षित। श्री प्रभूंचा परम भक्त ॥
प्रभुपाशी वेद शिकत। प्रभूला नमस्कार असो ॥३१॥

सकळ भारतामधून। आणिले विद्वान ब्राह्मण ॥
चारही वेद विप्र पढून। वेदविद्या जोपासती ॥३२॥

सर्वतोमुख यज्ञ करून। संगमीं अवभृथ स्नान ॥
लोकां मिळे फराळ भोजन। लक्षावधि लोक जमती ॥३३॥

हिंदू आणि अन्य धर्मीय। विविध लोकांचा समुदाय ॥
सर्वां इच्छित प्रभुराय। देत असती उणे नसे ॥३४॥

केवळ पैसा खर्च करून। यज्ञकार्य न ये घडून ॥
तेथें पाहिजे वरदान। प्रेरणा यज्ञप्रभूची ॥३५॥

सर्व धर्मीय असंख्य नर। यज्ञदर्शन घेण्या आतुर ॥
चारही वेदांचा मंत्रोच्चार। यज्ञीं आहुति यथाविधि ॥३६॥

विठ्ठलतवर तालुकदार। आणून आपले नोकर ॥
व्यवस्था राखिती सुंदर। लोकांनी नगर भरलेलें ॥३७॥

चार पांच कोसांवरून। सोवळ्यानें पदार्थ आणून ॥
पोंचविती ब्राह्मणी जन। लोणची सांडगे पापडादि ॥३८॥

घरचें कार्य भक्त मानिती। लक्षावधि रुपये लागती ॥
अन्नपूर्णा अखंडहस्ती। ऋद्धि सिद्धि दासी उभ्या ॥३९॥

सहस्रावधि पंक्ति उठती। पक्वान्नें सर्वांस मिळती ॥
मुलें लेकुरवाळ्या सती। त्यांनाही इष्ट अन्न मिळे ॥४०॥

कोणी उपाशीं न राहाती। शिधाही मिळे हवा त्याप्रती ॥
माणिक प्रभु दत्तमूर्ती। तेथें सर्व सिद्ध असे ॥४१॥

चाले आयति वर्षभर। कुंडभूमिति नाना प्रकार ॥
हवतसाहित्य भरपूर। शास्त्रोक्त सर्व जमविले ॥४२॥

यज्ञमंडपा नमस्कारून। भोंवती प्रदक्षिणा करून ॥
आंत बसती प्रभु येऊन। प्रेमें निघती स्वस्थळीं ॥४३॥

यज्ञकार्य बहुत काळ। यथाविधि होत मंगल ॥
परंतु अवचित अमंगल। घडून आलें अनिवार्य ॥४४॥

सतत पक्वान्नभोजन। करितां विप्राचा नंदन ॥
मृत्यु पावला हगओकून। यज्ञ मंडपीं प्रेत दिसे ॥४५॥

ब्राह्मण अक्रोश करीत। प्रभु करिती समजूत ॥
मला माना आपुला सुत। आमरण येथें रहावे ॥४६॥

चिंता कसली न करावी। अन्य कांहीं सोय सांगावी ॥
विप्र म्हणाला मी दुर्दैवी। माझा पुत्र जिवंत करा ॥४७॥

प्रभु सांगती मग तात्यांस। सर्व ब्राह्मणपदतीर्थास ॥
आतां आणून द्यावें मुलास। बघा जिवंत होतो का ॥४८॥

विप्रपदतीर्थ आणून। मुखीं घालतां विप्रनंदन ॥
जिवंत होई सत्त्वापालन। प्रभु दाविती सकळांना ॥४९॥

यज्ञाची पूर्णाहुति होऊन। सांग यज्ञपुरुषपूजन ॥
प्रभूंसह विप्र मिरवून। अवभृथ स्नान संगमीं ॥५०॥

यज्ञ-कार्य अति महान। यज्ञ-नारायणा नमन ॥
त्याचे स्मरणें पाप नासून। थोर पुण्य मिळतसे ॥५१॥



प्राचीन यज्ञीय आचरण। दाविती वैदिक ब्राह्मण ॥
संतुष्ट यज्ञ-नारायण। करितो क्षेम सकलांचें ॥५२॥

दक्षिणा वस्त्रादि अर्पण। करून तोषविले ब्राह्मण ॥
आशीर्वचन मंत्र-पूर्ण। लाधे विप्रवरांचें ॥५३॥

इतर जनांचाही सत्कार। करिती माणिक प्रभुवर ॥
सकळ ब्राह्मण नमस्कार। सभक्त प्रभूला नमन असो ॥५४॥

यज्ञा-करितां वस्तु जमत। त्यांतील कांहीं बाकी असत ॥
शिल्लक ठेवूं नको म्हणत। तिकडे दुर्लक्ष जाहलें ॥५५॥

परंतु अग्नि नारायण। प्रकटून करी भक्षण ॥
आग विझविण्या कोणा शीण। येऊं न देती सद्गुरु ॥५६॥

तूप वगैरे पुन्हां घालून। अग्नीचें केलें शांतवन ॥
प्रभु-आज्ञा सदा पाळून। रहावें हा मार्ग भला ॥५७॥

आज उद्यांची चिंता नसावी। प्रभुवाणी सदा बरवी ॥
प्रभु समर्था वृत्ति असावी। प्रेमें आज्ञा जशी तुझी ॥५८॥

मुख्य मठ चारी दिशांस। श्रीशंकराचार्य श्रृंगेरीस ॥
त्यांचा अधिकर या भागास। उपशाखा मठा असती ॥५९॥

त्यांतील हंपी विरूपाक्ष। जगद्गुरु येत प्रत्यक्ष ॥
अनेकवार भेटी साक्ष। माणिक नगरीं मिळतसे ॥६०॥

श्रृंगेरीचे शंकराचार्य। येती जगद्गुरु श्री आचार्य ॥
भेटतां स्वागत ऐश्वर्य। माणिक नगरीं फुलतसे ॥६१॥

मेणे पालख्या घोडे हत्ती। मोरचेलें चौऱ्या वारिती ॥
अबदागिरी फार शोभती। पुढें भालदार वगैरे ॥६२॥

शास्त्री पंडित कारभारी। कारकून स्वार शिपाई ॥
शागीर्द पाणके आचारी। गाई म्हशी उंट गाड्या ॥६३॥

सुमारें पाचशें माणूस। दिसलें आचार्य-स्वारीस ॥
प्रभु-भक्त हुमणाबादेस। व्यवस्था ठेविती उत्तम ॥६४॥



श्रृंगारिलें माणिक नगर। सामोरे जाती प्रभुवर ॥
गांठ संगमीं जयजयकार। फैर झडली बारांची ॥६५॥

रुमालानें हात बांधून। प्रभूंचे होतसे गमन ॥
मागें पुढें हत्ती असून। स्वारही दोनशें तसेच ॥६६॥

दहा हजार भक्तजन। संगें विप्र सहस्र दोन ॥
पुढें साधु संत सज्जन। आणि शिपाई अरबादि ॥६७॥

तासे चौघडे शंख गर्जती। जगद्गुरु पालखींत असती ॥
जयघोष त्यांचे चालती। प्रभु-भक्त गर्जती कल्पद्रुम ॥६८॥

अंगांत झुबा टोपी साधी। रुमालानें हातही बांधी ॥
पालखींतून उतरतां आधीं। साष्टांग नमिती श्रीप्रभु ॥६९॥

जगद्गुरु हात सोडिती। उभय आनंदें भेटती ॥
दोघांच्याही नेत्रीं दिसती। आनंदाश्रु गळतांना ॥७०॥

शंकर विष्णु भेट दिसे। वेशीवर पंचारती होतसे ॥
मिरवणूक गांवीं येतसे। दुपारीं दत्त-गादीकडे ॥७१॥

श्रीजगद्गुरु सिंहासनावर। तात्या पूजिती षोडशोपचार ॥
लोक करिती जयजयकार। तीर्थ प्रसाद सर्वा मिळे ॥७२॥

वस्त्रें भूषणें रत्ने गोधन। हत्ती घोडे पालख्या अर्पण ॥
भोजनाला पंच पक्वान्न। हजारों पात्रें जाहलीं ॥७३॥

प्रभूंनाही जगद्गुरु यती। कंठी घोडे पालखी हत्ती ॥
शालजोडी वगैरे अर्पिती। प्रभु म्हणती नको नको ॥७४॥

तात्या व दोन्ही मुलांप्रत। वस्त्रें भूषणें स्वामि देत ॥
सर्वां स्वामि-प्रसाद मिळत। नमन जगद्गुरु आचार्यां ॥७५॥

कांहीं दिवस प्रेमें राहून। जगद्गुरु करिती गमन ॥
लक्षावधि रुपये खर्चून। स्वागत केलें प्रभुरायें ॥७६॥

एकदां श्रीमंत व्यापारी। जहाजीं असतां सागरी ॥
वादळ वाढतसे भारी। आशा सुटली पूर्णपणें ॥७७॥

त्यांत प्रभु-भक्त यवन। सुचवी करा प्रभुस्तवन॥
इतर देव उदासीन। परंतु माणिक पातसे ॥७८॥

माणिक होते गादीवर। दोन्ही हात करिती वर॥
कबा भिजला अंगभर। खारट पाणी समुद्राचे ॥७९॥

नामांकित वली यवन। प्रभुपासून संपादन॥
करी योग-विद्या गहन। त्यावेळीं असे प्रभुकडे ॥८०॥

कांहीं दिवसांनी तो व्यापारी। पातला माणिक नगरीं॥
सांगे आपुली माहिती सारी। नवस ढीग रुपयांचा ॥८१॥

प्रभु हातांची खात्री झाली। भावें पूजा आरती केली॥
प्रभु म्हणती रक्कम सगळी। आहे का तें पहावें ॥८२॥

बिचारा गेला गोंधळून। परत हिशेब करून॥
थोडी बाकी त्वरें भरून। माणिक कीर्ति पसरवी ॥८३॥

एकदां गरीब ब्राह्मण। संगें घेई बंधु लहान॥
आणि होई प्रभुपदीं लीन। सांगे विनंती द्रव्याची ॥८४॥

या बंधूचे कराया लग्न। चारशें रुपये मजलागून॥
हवे सांगतां, प्रभुवचन। चिंता कांही न करावी ॥८५॥

विप्र राही कांहीं दिवस। परंतु न मिळे द्रव्यास॥
इष्ट मिळे हजारों लोकांस। पाहून द्विज संचित बने ॥८६॥

सर्प-दंश बंधूस होत। त्यामुळें त्याला मरण प्राप्त॥
प्रभुवरा कळलें वृत्त। म्हणती सर्पास बोलावा ॥८७॥

दत्तू न्हाव्यास प्रभु सांगती। जा घे येऊन सापाप्रती॥
मशाल घेऊन पेटती। दत्तू रात्रीं संगमाकडे ॥८८॥

मोठ्यानें हाकारून सांगत। ब्राह्मण दंश जो करीत॥
त्याला माणिक बोलावीत। फूत्कारीत साप आला ॥८९॥

घाबरून दत्तु असे येत। सर्पही येतसे सभेंत॥
शास्त्रीलोक चर्चा करीत। सर्व कांहीं ब्रह्म असे ॥९०॥



भिऊन पळती तेव्हां लोक। विनोदें बोलती माणिक॥
सर्वत्री म्हणती ब्रह्म एक। त्यांनीं तरी पळूं नये ॥९१॥

प्रभूंनीं वस्त्र अंगी घेतलें। ते नागोबापुढे टाकिलें॥
त्यावर सर्पराज बैसले। फणा काढून डोलती ॥९२॥

नागा माणिक प्रभु सांगती। येथें हजारों लोक येती॥
त्यांचें करावें रक्षण अती। तें सोडून पीडा दिली ॥९३॥

असें करूं नये तुम्ही थोर। आपल्या तोंडांत प्रभुवर॥
खारीक घालून सत्वर। दिली मृताचे बंधूकडे ॥९४॥

प्रभु सांगती कृपावचन। घाला मृत-मुखीं उगाळून॥
नागोबास दिलें धाडून। मृतास औषध खारीक ॥९५॥

मुखीं घालतां मृत जिवंत। सर्वही आश्चर्य चकित॥
ब्राह्मणास द्रव्य मिळत। अरिष्ट टळे प्रभुकृपें ॥९६॥

अरिष्टासाठीं विलंब झाला। हेंही समजलें ब्राह्मणाला॥
प्रभुरायाची गहनकळा। लीला प्रभूची तारक ॥९७॥

एकदां पेटल्या आगींत। माणिक प्रभु सांपडत॥
माणिक-नगर मृतवत। शोधून थकले सर्वही ॥९८॥

इतक्यांत माणिक आले। हर्षभरें लोक फुलले॥
जयजयकार घोष घुमले। धन्य माणिक सद्गुरु ॥९९॥

माणिक नृसिंह यतिवर। प्रसन्न अध्याय बाहात्तर॥
अर्पण करितां स्वीकार। श्रीदत्त करिती भक्तहिता ॥१००॥

श्रीगुरुदत्तात्रेयर्पणमस्तु